# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक १ | मुंबई | जुलै २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


## तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## पंगुम् लंघयते गिरीम्।

—सुहासिनी कीर्तिकर

अलीकडे मी एक कर्तृत्ववान आत्मकथा वाचली. 'फिरूनी पुन्हा जन्मले मी' नावाची. ही आत्मकथा आहे अरुणिमा सिन्हा नावाच्या तरुणीची. ही राष्ट्रीय पातळीवरची व्हॉलीबॉलपटू. घरी दारिद्र्य, वडिलांचा खून झालेला. आधार फक्त बहिणीच्या नवऱ्याचा कुटुंबाला. अशावेळी पोलीस दलाच्या नोकरीसाठी ही मुलाखत द्यायला निघते. गाडीत रात्रीच्या वेळी एक चोर तिची सोनसाखळी खेचतो. मोठी झटापट होते. या झटापटीत ती गाडीबाहेर रुळांवर फेकली जाते. मिट्ट अंधार. समोरून दुसरी गाडी भरधाव. हिचा उजवा पाय भरडला जातो. अंगावर जखमा होतात. आता आयुष्यात अंधारच अंधार. मदतीला कुणीच नाही. अशा गाड्यांवर गाड्या जातायेतात. सकाळी शेजारच्या झोपडवस्तीतून कुणी हातात टमरेल घेऊन येतो. भयानक दृश्य पहातो. ओरडत परत जातो. मग इतर येतात. 'मृत'समजून फलाटावर हिला ठेवतात. अपघातानंतर सात आठ तासानंतर अपघातानेच एका रेल्वेसेवकाला तिचे जिवंतपण जाणवल्यामुळे सरकारी इस्पितळात रवानगी. प्रचंड रक्त गेलेले. माणुसकीचा अजून मुडदा पडलेला नसतो म्हणूनच एक चतुर्थश्रेणी कर्मचारी आपले रक्त देतो. ऑपरेशन ताबडतोब व्हायला हवे. पण भूलतज्ञ हजर/उपलब्ध नाही. अरुणिमाचे नातेवाईक नाहीत. ही एकटी एकटी. पण हिमतीची. ती म्हणते 'माझे तसंच ऑपरेशन करा.' इलाजच नव्हता. भूल न देताच मोठे ऑपरेशन सहा तास चालते. तिचा एक पाय मांडीपर्यंतच शिल्लक रहातो. दुसऱ्या पायाला प्लॅस्टर लागते. डोक्याला टाके पडतात. हे सगळं उरकल्यावर मग कधीतरी तिची बहीण, भाऊ, मेव्हणा येऊन पोहोचतात. मेव्हण्यांकडून डॉक्टरांना कळते की ती राष्ट्रीय खेळाडू आहे. तिचं ऑपरेशनच्या वेळेचं खेळाडूपण कौतुकास्पद होतं. मग डॉक्टरांकडून ही बातमी मीडियावर जाते. पत्रकार, मुलाखतकार, नेते, राजकारणी, त्या राज्याचे मुख्यमंत्री... सगळेच्या सगळे तिला भेटायला येतात. तिला हलवून दिल्लीच्या हॉस्पिटलमध्ये नेलं जातं. आर्थिक मदत मिळते. तिला 'यापुढं काय करावंसं वाटतं?' - या प्रश्नाला तिचं उत्तर असतं, 'अपंगांसाठी मोठे क्रीडासंकूल उभारायचे आहे.' त्यालाही मदत मिळते. तिला पंधरा दिवसात उत्तम प्रतीचा कृत्रिम पाय मिळतो. पण एवढ्यावरच सगळं थांबतं का?

थांबत नाहीच. कारण पाय कृत्रिम असला तरी त्या पायाचीही प्रेरणा अरुणिमा आहे. प्रचंड जिद्दीची. प्रयत्नांची मेरूमणी. हा लाकडी पाय घेऊनच ती हिमालय चढण्याचं स्वप्न पहाते. 'ट्रेनिंग कॅम्प' मध्ये दाखल होते. बचिंद्र पाल या केंद्राच्या प्रमुख तिचा आत्मविश्वास पाहातात; पण त्यांना सगळेच अशक्य वाटते. कुणीच तिला पाठींबा देत नाही. फक्त मेव्हणे सोडून! कॅम्पमधील सर्व परीक्षा ती इतरांच्या बरोबरीनं; नव्हे... नव्हे; इतरांपेक्षा अधिक गुणांनी पास होते. ऑपरेशन होऊन अवघे तीन महिने झाले असतात तेव्हा. मग मात्र कॅम्पप्रमुख तिला साथ देतात. हिमालय चढण्यासाठी आवश्यक सर्व प्रकारचे शिक्षण तिला इतरांबरोबरीने दिले जाते. असं गृहीत धरूनच की पहिल्या एक-दोन बेसकॅम्पपर्यंतच हिची मजल जाईल. 'अति आत्मविश्वास नको.' 'श्वासाचं नियंत्रण शिक, 'कोणताही छोटा सर्दी खोकल्यासारखा आजारही होता कामा नये', 'जेव्हा परत फिरावसं वाटेल तेव्हा संकोच न करता परत फिर'... असे अनेक हितकारी सल्ले दिले जातात. प्रयोजकत्व मिळवून त्या जीवघेण्या घटनेनंतर आणि कठीण ऑपरेशननंतर अवघ्या दीड

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## स्त्री जन्मा तुझी कहाणी
## स्त्रियांवरील हे अत्याचार थांबणार कधी?

**सौ. भक्ती प्रधान शेटे**

''कल्याणमध्ये महिला कंडक्टरला मारहाण, ठाण्यात एका स्त्री ऑटोरिक्षा महिलेचा विनयभंग, प्रियदर्शनी टॅक्सी महिलाचालकाबरोबर एक वाहतूक हवालदाराचे अश्लील भाषेत संभाषण, लालबाग परिसरात एका महिला टीव्ही रिपोर्टरवर बलात्कार व नंतर निर्घृण हत्या इत्यादी इत्यादी अशा अनेक बातम्या कानावर आल्या की, या आणि अशा अनेक सार्वजनिक व खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या मेहनतीने, कर्तृत्वाने अग्रणी आहेत. एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचा डांगोरा समाज पिटत आहे आणि दुसरीकडे महिलांवर होणारा अत्याचार हाच समाज उघड्या डोळ्यांनी पाहात आहे.

''साऱ्याच कळ्यांना हक्क आहे जगण्याचा,
मातीमधला वतन वारसा आकाशावर कोरण्याचा''

या सुप्रसिद्ध कवी सुरेश भटांच्या ओळी. मुलींना त्यांना हवं तसं मुक्त जगण्याचा संदेश यात आहे. पण आज समाजात चित्र मात्र खूप वेगळं आहे. खरंच या मुलींना, स्त्रियांना समाज मुक्तपणे जगू देतोय का? असा प्रश्न आज पडतो.

भारतात सामाजिक विषमता ही जात, धर्म आणि लिंग या तीन घटकावर आधारीत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे अशी पारंपारिक मानसिकता आहे. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्तीचे सारे अधिकार नाकारण्यात आले होते. धार्मिक कायद्यांचा आधार घेऊन स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली गेली. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यासारख्या अनेक अन्यायकारक चालीरितीनी लाखो स्त्रियांचे अवघे आयुष्यच करपून टाकले. भारतात ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत या निर्दयी प्रथा चालूच होत्या. ब्रिटीश काळात जोतीबा फुले आणि सावित्रीबाई, राजा राममोहन रॉय यासारख्या भारतीय समाज सुधारकांची स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ आणि ब्रिटिशांचा स्त्री-विषयक पाश्चात्य दृष्टिकोन यामुळे ब्रिटिशांनी अनेक वाईट चलीरीती बंद करण्यासाठी कठोर कायदे केले. सतीप्रथा बंदी, विधवा पुनर्विवाह यासारख्या कायद्यांनी अनिष्ठ प्रथांना ब्रिटिशांनी अडसर लावला. स्वातंत्र्यानंतरही अशाप्रकारचे अनेक कायदे करण्यात आले. परंतु स्त्रियांच्या अत्याचाराचे वाढते प्रमाण रोखण्यात आपण अयशस्वी ठरलो आहोत.

मुली बाहेर सुरक्षित नाहीत म्हणून त्यांनी सातच्याआत घरी आलेच पाहिजे; किंबहुना बाहेरच पडू नये. असे पूर्वी बोलले जायचे. परंतु लैंगिक शोषण करणारा एखादा नराधम हा आपल्याच घरातला काका, मामा किंवा शेजारील कुणी एक असतो. त्यामुळे या मुली, स्त्रिया आपल्या घरातच सुरक्षित आहेत हे गृहीत धरणे चुकीचे आहे.

आता हेच पहाना, आईच्या पोटातही मूल सुरक्षित नाही. त्या जन्माला येण्याआधीच त्यांची हत्या केली जाते.. किंबहुना जन्माला येताच त्यांना पोरकं केलं जातं वा त्यांची हत्या केली जाते.

या व्यतिरिक्त महिला सुरक्षेचे आणखी काही पैलू आहेत. अवैध मानवी व्यापार, छेडछाड, ऑनर किलिंग, एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या / ॲसिडफेक, सायबर क्राईम, अश्लील चित्र काढणे / वितरित करणे, ब्लॅकमेल करणे, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ,

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
वर्षात आपल्या दीड पायाने एव्हरेस्ट सर करायला ही निघते. भलेभले गारठतात, परत फिरतात. ही आपल्या कृत्रिम पायाचे खिळे घट्ट करत करत, बर्फाळ संकटांचा सामना करत अखेर 'एव्हरेस्ट' गाठतेच. भारताचा ध्वज एव्हरेस्टवर रोवते. खरंच... अक्षरशः 'एका पायावर' नाचते. बरोबरचा मार्गदर्शक शेरपाही चकीत होतो. भारतातीलच नव्हे; जगातील ही पहिली अपंग महिला जिनं एव्हरेस्ट शिखर सर केलं! एक विश्वविक्रम तिनं केला. ऑपरेशननंतर अवघ्या दीड वर्षात. त्यानंतरच्या वर्षात जगातील अशी आणखी तीन शिखरे तिने सर केली. केवळ जिद्दीच्या बळावर. ईश्वरावर श्रद्धा ठेवून. प्रयत्नांती परमेश्वर जाणून. तिचा खरंच पुन्हा जन्मच की हो! आता ती अपंगांसाठीच्या क्रीडासंकूलासाठी काम करतेय. 'अरुणिमा प्रतिष्ठान' आहे त्यासाठी. केव्हढा भव्य स्वप्नपट हा. स्वप्नं पाहिली की ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शारीरिक व्यंगही आड येऊ शकत नाहीत... त्याची ही प्रेरणादायी कहाणी.

विश्वविक्रमी अरुणिमा. प्रेरणादायी अरुणिमा. आदर्श वस्तुपाठ घालून देणारी अरुणिमा. आयुष्य संकटांशी सामना करीत कसं घडवावं, कसं जगावं याचं प्रत्यक्ष उदाहरण. सध्या परीक्षांच्या निकालांचा मौसम आहे. नव्वद टक्केवाल्यांनाही 'कट ऑफ' लाईनपर्यंत इच्छित केंद्रात पोचणं कठीण होऊन बसलंय. काही हरकत नाही! अरुणिमा पाहिली ना आपण? दरिद्री घरात वाढणारी, नोकरीसाठी वणवण करणारी, चोरांच्या तावडीत सापडणारी... पण तावडीतून सुटून प्रतिकूलतेवर चढाई करून विश्वविक्रम करणारी. दहावी, बारावीला अपेक्षित गुण (म्हणजे यश नव्हे!) नाही मिळाले तरी हरकत नाही. इच्छित महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही तरी हरकत नाही. प्रतिकूलताच साह्यकर्ता बनवण्याचं बळ आपल्या विद्यार्थ्यांना बाळकडू म्हणूनच मिळालेलं असणार... आहे. तेव्हा हवी फक्त जिद्द. असावा फक्त आत्मविश्वास. हवे आहे कुटुंबाचे पाठबळ. ते तर आहेच तुम्हा सर्व विद्यार्थ्यांकडे. फक्त आपल्या आयुष्यात नेमकं कुठलं एव्हरेस्ट आपल्याला सर करायचं आहे ते निश्चित हवं मला खात्री आहेच की आपल्या ज्ञातीतील असे अनेक अरुण आणि अनेक अरुणिमा आपल्याला हवी ती शिखरे 'एव्हरेस्ट' चढाई करून सर करतील. हल्ली तर जागतिकीकरणाच्या झिलईत एकच एक एव्हरेस्ट उरलेले नाही. अनेक क्षेत्रे कर्तृत्वासाठी खुली झाली आहेत.

अश्या खुल्या कर्तृत्वक्षेत्रात विद्यार्थी मित्रहो, तुम्ही छोट्या मोठ्या अडथळ्यांची शर्यत लीलया पार पाडाल. जिंकाल, चमकाल. विक्रम कराल. खात्री आहे माझी. कारण आपण 'परभू' मुळातच बुद्धिमान सुजाण. परस्परांना सहकार्य करणारा. सुसंस्कृत.

या सुसंस्कृत वृत्तीमुळेच आपल्या कुटुंबातील थोडे अडीनडीचे प्रसंग, पाल्यांचे कमी अधिक गुण आपण समजून घेऊ शकतो. त्यांना शिखर सर करण्यासाठी साथ देऊ शकतो. त्यांच्या धडपडीत त्यांचा आधार होऊ शकतो. म्हणूनच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचं मनापासून अभिनंदन करताना सर्व पालकांचेही अभिनंदन. कारण हे पालकच आपल्या पाल्याचा खरा खोटा; पण आधार देणारा पाय असतात. खरं तर भक्कम पायाच असतात. तर... या 'पायाभूत' पालकांचं मन:पूर्वक अभिनंदन आणि सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मनापासून शुभेच्छा. तुम्ही सर करीत असलेल्या एव्हरेस्टकडे आम्ही नजर लावून आहोत. जय हो!

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाच्या शतक महोत्सवानिमित्त व अधिक मासानिमित्त हळदीकुंकू समारंभ पाठारे प्रभु सोसायटीचे सभागृह, १२ वा रस्ता खार (प.) येथे रविवार दिनांक २१ जून २०१५ रोजी साजारा झाला. त्याप्रसंगी महिला समाजातील भगिनींनी 'एकपात्री अभिनय' कार्यक्रम सादर केला. तसेच निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धा (घरून लिहून आणणे) झाल्या.

पहिली, दुसरी व तिसरी घंटा झाल्यावर नाटकाप्रमाणे कार्यक्रमाची सुरूवात झाली. समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकरांनी रंगमंचाची विधिवत पूजा केली. सौ. रॉनिका विजयकर व तिचे सहकारी सौ. ऐश्वर्या वेलकर, कु. ख्याती वेलकर, कु. तन्मयी विजयकर, सौ. पूजा कोठारे ह्यांच्या समवेत नांदीने सुरूवात झाल्यावर 'स्वयंवर' नाटकातील दोन पदे सौ. अक्षदा तळपदेनी साभिनय सादर केली. त्यानंतर सौ. मीना धराधर आंबवणे ('आनंदीबाई' भाऊबंदकी) सौ. त्वरिता दळवी ('वल्लरी' शारदा) सौ. नीता सेंजित ('कृतिका' संशय कल्लोळ) श्रीमती वंदना नवलकर ('गार्गी' लग्नाची बेडी) तसेच सौ. पूजा अजिंक्य ('दादीबाय' हुंडा) ह्यांनी प्रवेश सादर केले. सूत्रसंचालन श्रीमती स्वाती राणे यांनी केले.

त्यानंतर झालेल्या हळदीकुंकू समारंभात समाजातर्फे उपस्थित भगिनींना मूग व शीतपेय व म्हैसूर देण्यात आले. गजरे सौ. साया नवलकर यांजकडून भेट म्हणून देण्यात आले. मुगाची व्यवस्था सौ. बिंबा नायक ह्यांनी सांभाळली.

एकपात्री अभिनय कार्यक्रमाचे आयोजन सौ. वृंदा जयकर ह्यांनी सौ. मीना धराधर आंबवणे ह्यांच्या सहकार्याने केले होते.

कार्यक्रमात भाग घेतलेल्या भगिनींना समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकरांनी भेटवस्तू दिल्या. सौ. मीना धराधर आंबवणे ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली. संवादनीची साथ श्री. शेषनाथ पावसकर, श्री. चंद्रकांत सुतार व तबल्याची साथ श्री. प्रदीप राणे ह्यांनी केली.

याप्रसंगी श्रीमती सीमा नारायण अजिंक्य ह्यांनी आपल्या सासूबाई कै. सुनंदा हणमंतराव अजिंक्य ह्यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय विषयांच्या बक्षिसासाठी (मेडलसाठी) रु. ३०,००० दिले.

या दिवशी घेण्यात आलेल्या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे -

**निबंधस्पर्धा**

***(महिलांसाठी) - विषय*** - मनी वसे ते स्वप्नी दिसे

१) श्रीमती शीला शंकर विजयकर - प्रथम पुरस्कार

२) सौ. जयमती जयपाल तळपदे - द्वितीय पुरस्कार

३) सौ. छाया दिलीप विजयकर - तृतीय पुरस्कार

***१५ वर्षांखालील मुलींसाठी विषय*** - माझा वाढदिवस

१) कु. आलीशा निकोलॉय कीर्तिकर - प्रथम क्रमांक

२) कु. चिन्मयी निखिल तळपदे - द्वितीय क्रमांक

३) कु. चैतन्या नितीष कीर्तिकर / वेदिका आश्विन प्रधान - तृतीय क्रमांक विभागून

**काव्य स्पर्धा** (महिलांसाठी) विषय - निसर्ग

१) श्रीमती सुरूपा राणे देवरुखकर - प्रथम क्रमांक

२) सौ. सुजाता रामनाथ कोठारे - द्वितीय क्रमांक

३) सौ. मीना धराधर आंबवणे - तृतीय क्रमांक

महिलांच्या निबंध स्पर्धा व काव्य स्पर्धेचे परीक्षण प्राचार्या श्रीमती लतिका नाईक ह्यांनी केले. मुलींसाठी असलेल्या निबंध स्पर्धेचे परीक्षण डॉ. पायल राणे ह्यांनी केले.

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १३ सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात, गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर, १२ वा रस्ता खार (प.) येथे घेण्यात येईल. त्याचदिवशी पाठारे प्रभु महिला समाजाच्या कार्यकारी समितीसाठी निवडणूक घेण्यात येईल. सर्व सभासद भगिनींनी उपस्थित रहावे अशी विनंती मंडळाने केली आहे.

ज्या भगिनींना निवडणूकीसाठी फॉर्म (शुल्क रु. ५) पाहिजे असतील, त्यांनी खालील भगिनींशी संपर्क करावा.

१. सौ. अक्षदा तळपदे -
मो. नं. ९८२०८९४७७०
फोन नं. ०२२२२०९५९००

२. सौ. बिंबा नायक -
मो. नं. ९८३३१२१८८४

३. सौ. नूतन किर्तिकर -
मो. नं. ९६१९१९६८१३१
फोन नं. ०२२२६०४९१५९

४. सौ. वृंदा जयकर -
मो. नं. ९८९२१७५१३८
फोन नं. ०२२२८९८१७०९

दिनांक १ ऑगस्ट २०१५ ते ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत फॉर्म मिळतील. फॉर्म मागे घेण्याची तारीख ९ सप्टेंबर राहील.

विस्तारीत संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)
हुंड्यासाठी त्रास देणे / जाळून टाकणे, स्त्री म्हणून प्रमोशन, बदली नाकारणे / संधी हिसकावून घेणे, सतत घालूनपाडून बोलून मानभंग करणे, हा न दिसणारा छळाचा प्रकार आहे. 'तुझी अक्कल चुलीपुरतीच', 'पायातली वहाण पायातच बरी' वगैरे वगैरे बोलणी. याशिवाय कठीण परिस्थितीत राहणाऱ्या महिला - वेश्या व्यवसायातील महिला, स्थलांतरित महिला, प्रवासी महिला, रात्रपाळी करणाऱ्या महिला, एकट्या रहाणाऱ्या स्त्रिया, रूढी-परंपरेचा जाच सहन करणाऱ्या महिला म्हणजेच मुरळी, देवदासी, नन्स, संन्यासिणी... यातल्या प्रत्येक मुद्यावर एक एक स्वतंत्र लेख लिहिता येईल. पण, आता वेळ आली आहे ती प्रतिबंधात्मक उपायांची. सगळ्यांनी सतर्क, जागरूक आणि क्रियाशील होण्याची. ''मी अन्याय, अत्याचार करणार नाही, होऊ देणार नाही. स्त्रियांची सुरक्षा, सन्मान आणि प्रगतीसाठी कटिबद्ध आहे,'' असा निश्चय करण्याची.

महिला सुरक्षेसाठी रान उठवण्याची गरज आहे. सगळ्यांनीच महिलांचे प्रश्न केवळ महिलांचेच आहेत. त्यांनीच ते सोडवावे, हा दृष्टिकोन बदलण्याची वेळ आली आहे. एखाद्या महिलेवर जेव्हा बलात्कार होतो किंवा अन्याय-अत्याचाराची घटना घडते, तेव्हा वडील म्हणून, भाऊ म्हणून, नवरा म्हणून, पुरुषांनाही त्याची झळ पोहोचणे गरजेचे आहे. पीडित व्यक्तीची लाज वाटण्यापेक्षा आपण रक्षण करण्यास असमर्थ ठरलो म्हणून अपराधीपणाची भावना मनात येणे हे गरजेचे आहे व स्त्रियांना वायफळ सल्ले देण्यापेक्षा अशा समाजकंटकांवर कशाप्रकारे आळा घालता येईल याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे निष्क्रियता सोडून, संवेदना जागवण्याची आणि कृतिशील होण्याची अत्यंत गरज आहे.

जशा प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे ''स्त्री जन्मा तुझी कहाणी'' ह्या अध्यायालाही दोन भाग आहेत.

पहिला जो आपण वाचलात, ज्यात स्त्री ही सोशिक, अबला, अन्याय सहन करणारी दारुण अवस्थेतील भासते, तर ''दुसरीकडे स्वैराचाराने वागणारी, मस्तवाल, बेताल...

(उर्वरित भाग पुढील सदरात)

लेखांक-७

# अर्थसंवाद

**-सौ. उर्वशी आनंद धराधर**

बँकेत खाते उघडले. पासबुक, स्लिप बुक व चेक बुक मिळाले. आता आपले दैनंदिन व्यवहार बँकेमध्ये करायला आपण सज्ज आहोत असे आपल्याला वाटते. पण जरा जपूनच हं! आपल्या खात्याचा नंबर आपण बँकेला खाते नियमित वापरताना लिहिलेल्या सूचना आपल्या पासबुकात बँकेने नीट नमूद केल्या आहेत ना, हे पाहणे जरूरीचे आहे. उदा. आपले खाते जर जॉईंट नावाने असले तर दोन्ही खातेदारांची नावे नीट लिहिली गेली आहेत ना, आपले खाते वापरताना दोन्हीपैकी एक, दोन्ही अथवा प्रथम नाव असलेला खातेदार अशापैकी ज्या सूचना बँकेला दिल्या आहेत त्याची नीट नोंद आपल्या पासबुकात बँकेने केली आहे हे पाहिले पाहिजे. आपल्या खात्याला आपण लिहिलेले नामनिर्देशन (नॉमिनेशन) देखील बँकेने लिहून त्याची आपणास वेगळी प्रत दिली पाहिजे.

चेकबुक आता आपणास कुरिअरमार्फत घरी येते. बँकेच्या काऊंटरवर मिळत नाही. तेव्हा हे चेकबुक बँकेने सांगितल्याप्रमाणे ८ दिवसाच्या आत आले पाहिजे. आपण घरी नसताना जर चेक बुक आले तर घरातील इतर मंडळींना ते माहित असले पाहिजे व आपण आल्यावर ते आपल्या ताब्यात घेतले पाहिजे. या चेकबुकवरही आपला खाते क्रमांक व नाव बरोबर छापले गेले आहे ना तेही बघितले पाहिजे. तसेच चेकबुकात किती चेक आहेत, तेवढेच नीट आहेत ना ते मोजून बघितले पाहिजेत. तुम्ही म्हणाल, काय ह्या सूचना देत आहेत? परंतु हल्ली बँकेत होणारे फ्रॉड पाहिले व त्याची कारणे शोधली तर लक्षात येते की आपल्या या साध्या वाटणाऱ्या गोष्टी नीट पडताळून पाहिल्या नाहीत म्हणूनच हे फ्रॉड झाले. मग आपली स्वकष्टाची शिल्लक कोणी ऐरागैरा लुबाडून घेऊन गेला तर कसे व्हायचे?

चेकचे हे धोके आजकाल खूप वाढले आहेत. परवाच एका खातेदाराने पासबुक भरून घेतल्यावर पाहिले की ५,५३,००० ही रक्कम त्याच्या खात्यातून काढली गेली आहे. हे पाहिल्यावर त्याला दरदरून घाम फुटला. चौकशी अंती समजले की त्या नंबरचा चेक त्याच्या चेकबुकातून अगोदरच काढून घेतला होता व त्याची हुबेहूब सही करून तो चेक त्याच्या खात्यातून वटवला होता. नवीन चेकबुक आल्यावर सर्व चेक नीट तपासले असते तर हा गहाळ चेक त्याला त्वरित कळला असता!

कित्येक वेळा आपण एखाद्या क्लबची वर्गणी, देणगी चेकद्वारे पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवत असतो. असे पाठवताना काळजी घेणे खूप गरजेचे आहे. त्या चेकची नोंद योग्य काळात आपल्या पासबुकात आली आहे ना ते तपासले पाहिजे. अन्यथा हा चेक पोस्टात अथवा कुरिअरमध्ये गहाळ होऊ शकतो. असे व्यवहार घडतात. आपला चेक काढून त्यावर व्यवस्थितपणे पेयीचे नाव व चेकची रक्कम बदलून तो चेक वठवला जातो व ही चोरी इतकी सफाईदारपणे केली जाते की ती बँकेच्या लक्षातही येत नाही. बँकेने चेक जरा जरी गडबड वाटली तर चेक डिटेक्शनमशीनमधून वाचल्यास हे सूक्ष्म बदल लक्षात येऊ शकतात. पण रोजच्या धकाधकीत कधीतरी जर हे बदल नजरेआड झाले तर फार नुकसान होऊ शकते. त्यामुळे आपण काळजी घेणे गरजेचे आहे.

कित्येक वेळा चेकबुक पाठवल्याचा संदेश भ्रमणध्वनीद्वारे आपणास मिळतो पण प्रत्यक्षात चेक बरेच दिवस मिळत नाही. तेव्हा त्वरित बँकेला ते कळवले पाहिजे. अन्यथा ते गहाळ होऊन आपल्याला फार मोठा भुर्दंड पडू शकतो.

चेकचे हे फसवणूकीचे व्यवहार बरेचदा घडलेले आपण पाहतो, वाचतो. सध्या आरटीजीएस व एनइएफटीद्वारे रक्कम ट्रान्सफर करता येते तेव्हा शक्यतो या पद्धतीचा अवलंब केल्यास चेकचे गैरव्यवहार आपण टाळू शकतो.

अजून एक हल्लीच घडलेला किस्सा सांगते. आपल्या घरी फ्रिज रिपेअर करायला आलेल्या इसमाने फ्रिज रिपेअर केला. त्याचे बिल देऊन त्वरित चेकची मागणी केली. घरमालकीणीने आपले चेकबुक आणले व त्या चेकची रक्कम लिहू लागल्या. रिपेरमनने त्यांना तेवढ्यातच पाणी देण्याची विनंती केली. त्या त्वरित उठून पाणी आणण्यास गेल्या व नंतर त्यांनी तो चेक पूर्ण लिहून त्या माणसास दिला. काही दिवसांनी त्यांच्या खात्यातून ६,८५,००० वजा झालेले त्यांच्या लक्षात आले. बँकेत जाऊन चौकशी करता तो चेक त्यांच्याच खात्यातील व त्यांची हुबेहूब सही करून वठवला होता. त्यांना समजेना हे कसे काय शक्य आहे? आपले एवढे मोठे नुकसान झालेले बघून त्या हादरून गेल्या. मग त्यांच्या लक्षात आले की त्या दिवशी पाणी आणायला त्या आत गेल्या तेव्हा त्या रिपेरमनने त्यांच्या चेकबुकातून लगबगीने एक कोरा चेक काढून घेतला होता व त्यांनी कंपनीच्या नावाने चेक त्याच्याकडे दिल्यामुळे त्यांची सही त्याला कळली तेव्हा हुबेहूब तशी सही करून त्यांनी ते पैसे काढले. पण हे उघडकीला कसे आले? बँकेकडे हा इसम बेअरर चेक घेऊन पैसे काढायला गेला होता. कॅशियरच्या केबिनबाहेर लावलेल्या कॅमेऱ्याने त्याचा फोटो टिपला होता. खातेदाराला आपल्या खात्यातील रक्कम वजा झाल्याचा संदेश आल्यावर त्वरित बँकेकडे धाव घेतल्यावर बँकेने दाखवलेल्या फिल्ममध्ये त्यांनी त्या इसमास ओळखले. तोपर्यंत तो इसम ती रेफ्रीजरेटरची कंपनी सोडून पसार झाला होता. म्हणतात ना, अब पछतावे होत क्या, जब चिडिया चुग गई खेत!'

या गोष्टीवरून आपण साऱ्यांनी बोध घेतला पाहिजे. कधीही आपले चेकबुक उघडे ठेवून अनोळखी इसमाच्या पुढ्यात 'माकडाच्या हाती कोलीत' ठेवून कुठे जाऊ नये. कोणाच्या डोक्यात काय कल्पना येईल सांगता येत नाही. आपले पास बुक, चेक बुक ही फार महत्त्वाची कागदपत्रे आहेत. ती नीट जपून ठेवणे गरजेचे आहे. तसेच आपले पासबुक वेळच्या वेळी भरून घेणे, तपासणे महत्त्वाचे आहे. आपल्या बँकेला आपला भ्रमणध्वनी क्रमांक देऊन त्याची नोंद करण्यास सांगावे. आपल्या खात्यातील जमा व काढलेल्या रकमांचे संदेश आपल्याला त्वरित देण्याची सूचना द्यावी. आपल्या भ्रमणध्वनीवर बँकेकडून आलेले संदेश पाहून त्यात जर काही चूक वाटल्यास त्वरित बँकेत जाऊन पडताळून पाहिले पाहिजे. एवढी सावधगिरी बाळगली तर आपल्या खात्यातील गैरव्यवहार टाळता येतील. आपला स्वकष्टार्जित पैसा अपव्यय होण्यापासून वाचेल. चला आपण दक्ष राहू या!''

*

## पावन - पूजा

वसुंधरेच्या जिव्हाळ्याची
कृतज्ञता दाविली
धरतीची ही पावन-पूजा
आज कुणी बांधिली?।। धृ.।।
आषाढातील पर्जन्याचा
अभिषेक केला
रविकिरणांच्या वस्त्राने कां
माथा सुकविला
शरदाच्या चांदण्यात चंदन -
शीतलता गमली ।।१।।
कुंकुमतिलकही सूर्यबिंब ते
सागरामधले
हिरवळीचे वस्त्र रेशमी
तिजला नेसविले
विविधरंगी अतिसुवासिक
पुष्पे ही वाहिली।।२।।
नानाविध ह्या मधुर फळांनी
नैवेद्यही सजला
दवबिंदूंची मौक्तिकमाला
अर्पियली तिजला
चामर ढाळित पवन मंदसा
छत्र घनसांवली।।३।।
पिकली शेते ऊद सुगंधी
धुके जणूं धूप
काजव्यांचे नक्षत्रांचे
लावियले दीप
द्विजगणांनी सुस्वरकंठी
आरती ही गायिली।।४।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# प्रिय महेश

**-नीलिमा सुजन राणे**

प्रिय महेश,

अरे, तुला ह्या चित्रपटसृष्टीत येऊन ५० वर्ष झाली? बाप रे! तुझ्याच शब्दात सांगायचे तर "Damm it". विश्वासच बसत नाही. मला तो लहान, मस्तीखोर, गोडगोड दिसणारा, विनोद करणारा महेशच आठवतो. पण तुझा खूप अभिमान वाटतो रे ! खूप कौतुक वाटते.

तुझ्याबद्दल कुठून लिहायला सुरुवात करायची याचा विचार करताना मला तुझा जन्म आठवतो. मी ६/७ वर्षाची होईपर्यंत जेनमाकडे (माझी मावशी, महेशची आई, सरोज कोठारे) वाढली. जेनमाशिवाय माझे पान हलत नसे. जेनमाचे लग्न झाले आणि थोड्याच दिवसात तिला तुझी चाहूल लागली. सगळे मला चिडवायचे 'जेनमा आता तुझी रहाणार नाही. ती तिच्या बाळाची'. मग मला खूप भीती वाटायची. तुझा रागही यायचा. पण तुझ्या जन्मानंतर ते प्रेम दुप्पट झाले कारण तूपण तेव्हढंच प्रेम दिलंस ना! Thank you for that. मी 'जेनमा' म्हणायची तसे तूपण जेनमाच म्हणायला लागलास. पण तू जेम्मो अशी गोड हाक मारायचास (अजूनही तशीच हाक मारतोस). तेव्हा आपले पापा (म्हणजे आजोबा) बोलायचे, 'लागलं जेनमाचं वासरु हम्मा हम्मा करायला' आणि आता तर काय सगळी चित्रपटसृष्टीच तिला जेनमा म्हणून ओळखते.

जेनमा आणि अंबरभावोजी (महेशचे वडील अंबर कोठारे) 'झोपी गेलेला जागा झाला' ह्या गाजलेल्या नाटकात काम करायचे. त्यांच्या तालमीना जाऊन जाऊन सगळ्यांचे dialogue तुला पाठ झाले होते. ते तू हुब्बेहूब हावभाव करून बोलायचास. दिसायला तर तू छान होतासच, पण ॲक्टिंगही इतकी बेमालूम न लाजता करायचास. कित्ती मज्जा वाटायची तुझ्याकडे बघून.

तुझ्या डॅडीनी दत्ता भट लिखित आणि दिग्दर्शित 'जेथे जातो तेथे' ह्या नाटकाची निर्मिती केली, तेव्हाची गोष्ट. मला वाटते, दत्ता भटना तुझ्या डॅडीनीच रंगभूमीवर ह्या नाटकाद्वारे ब्रेक दिला ना? पहिल्या प्रयोगाला प्रमुख पाहुणे म्हणून गजानन जहागिरदारना आमंत्रण द्यायला डॅडी आणि दत्ता भट गेले तेव्हा तू नेहमीसारखा डॅडींच्या बरोबर होतासच. आर्कीमिडीस जसा 'ureka ureka' करत ओरडला, तसे तुला पाहून जहागिरदार ओरडले 'छोटा जवान मिळाला, छोटा जवान मिळाला'. आणि मराठी चित्रपटसृष्टीला तुझ्यासारखे अनमोल रत्न मिळाले. Marathi film Industry is lucky to have you.

'छोटा जवान'मधल्या प्रसिद्ध गाण्याच्या शूटींगला मीपण तुझ्या आणि जेनमाबरोबर पुण्याला आलेली. प्रभात स्टुडियोमध्ये ३/४ दिवस शूटींग चालू होते. दिग्दर्शक सांगतील ते तू बरोबर करून दाखवायचास. सगळे तुझे कित्ती कौतुक करायचे. मला नक्की आठवत नाही पण बहुतेक ते राम गबाळे असावेत, ते जहागिरदारांना म्हणाले, 'मुलगा मस्त शोधलात, हा जर सिनेमात काम करत राहिला तर पुढे नक्की नाव कमवेल. And you proved him right.'

'छोटा जवान'नंतर बालकलाकार म्हणून तुझे बरेच चित्रपट आले. बहुतेक सगळे हिंदीच.....राजा और रंक, घरघरकी कहानी, मेरे लाल, छोटाभाई, सफर, उपकार वगैरे वगैरे....हिंदीच्या त्या वेळच्या नूतन, शर्मिला टागोर, संजीवकुमार, मनोजकुमार, राजेश खन्ना, रेहमान वगैरेसारख्या मोठमोठ्या कलावंताच्या बरोबर काम करताना तू कुठेच कमी पडला नाहीस.

'राजा और रंक' दिवाळीच्या सुमारास प्रदर्शित झाला. आपण त्याच सुमारास ग्रॅन्टरोडच्या कॉरोनेशन रेस्टोरेंटमध्ये जेवायला गेलो होतो. जेवण झाल्यावर खाली उतरून पान घेत होतो आणि काही कळायच्या आत आपल्या आजुबाजूला तुला पहायला इतकी गर्दी झाली की आपण मुलं म्हणजे तू, मी, राजनभैया आणि बालम घाबरूनच गेलो. तुझ्या डॅडींनी तुला कसंबसं गाडीत बसवलं आणि तुम्ही निघून गेलात. That was my first experience with fan following. असे पुढे कित्येक प्रसंग पाहिले ते वेगळेच.

पुढे तू मराठी चित्रपटात अभिनय करत राहिलास, पण शिक्षण सोडलं नाहीस. तिथेही चमकलास. BSc, LLB केलेस, वकिलीची सनद घेतलीस. Legal practice पण केलीस, (जेनमा तुझ्या पाठी होतीच) पण चित्रपटसृष्टी तुला चैन पडू देईना आणि तू निर्मिती आणि दिग्दर्शनाच्या क्षेत्रात उतरलास. मराठी चित्रपटांना वेगळंच वळण दिलस बाबा. रडारडीतून विनोदाकडे वळवलंस. एकामागून एक सुपरहिट चित्रपटांची मालिकाच उभी केलीस. 'धूमधडाका'पासून 'झपाटलेला-२' पर्यंत धमालच केलीस. लक्ष्मीकांत बेर्डेसारखा कलावंत मराठीला दिलास. Dolby, CinemaScope , 3D सारखी techniques तूच मराठीत आणलीस. उगाच का तुला मराठी चित्रपटसृष्टीत `Revolutionary figure' म्हणून ओळखतात? मलाही 'धागडधिंगा' ह्या चित्रपटात चान्स दिलास. पण माझा एक पाय भारतात तर दुसरा परदेशात. त्यामुळे मला जम बसवता आलाच नाही.

प्रथम बालकलाकार म्हणून; नंतर निर्माता, दिग्दर्शक, स्क्रीन प्ले राईटर म्हणून बरेच अवार्ड तुझ्या नावावर आहेत आणि आता तर काय वेगवेगळ्या संस्था तुझा, तुझ्या कार्याचा गौरव करत सुटल्यात. प्रत्येक दिवशी न्यूजपेपर नाहीतर न्यूजचॅनलवर तू दिसतोस.

चित्रपटांबरोबर तू टीव्ही मालिकांचीही निर्मिती सुरू केलीस. त्यातही तू टॉपचा निर्माता झालास. सध्या गाजत असलेली 'जय मल्हार' आणि 'जयोस्तुते' ही तुझीच निर्मिती.

तुला बायकोपण साजेशी मिळाली. (ह्यालाही नशीब लागते बाबा) मज्जा म्हणजे माझ्याच नावाची 'नीलिमा'. मराठीला तू दिलेली ताजी देणगी म्हणजे तुझा मुलगा आदिनाथ.

तुझ्याबद्दल सांगण्यासारखी एक मोठ्ठी गोष्ट म्हणजे तू इतका प्रसिद्ध झालास तरी तुझे पाय जमिनीवरच आहेत. आम्हा भावंडांबरोबर (मावस, मामे, आते, चुलत) भावासारखाच वागतोस. आम्हाला गोळा करतोस, आमच्यातलाच एक राहून थट्टा मस्करी करतोस. We all really appreciate and love you for that.

तर महेश अशा ह्या तुला, तुझ्या नीलिमा, आदिनाथ आणि ऊर्मिले बरोबरच्या पुढील वाटचालीसाठी खूपखूप शुभेच्छा.

आमच्यावर असेच प्रेम करत रहा आणि खूप खूप यशस्वी चित्रपट/मालिका काढ.

तुझी दीदी,
नीलिमा सुजन राणे

*




## गंमत म्हणून-

एकदा एक उंदीर आणि एक मांजर एकत्रितपणे दारूच्या पार्टीत सामील झाले. जरा 'चढल्यावर' मांजर म्हणाली, 'ए उंदरा, आपण एकत्र पितोय म्हणून. नाहीतर मी तुला खाऊनच टाकले असते.'' उंदीर कसं सहन करणार हे ? तो त्याच तालात म्हणाला, ''ए मने, बाई म्हणून सोडून देतोय तुला. वाट्टेल ते बरळू नकोस.''!!

# अग्निहोत्र उपासना

**-सौ. विजयश्री नवलकर**

ती रविवारची संध्याकाळ होती. दररोज अग्निहोत्र करण्याचा आमचा नियम असल्यामुळे मी व माझे यजमान अग्निहोत्राची तयारी करून आहुती देण्यास आत गेलो. आमच्या घरी एक काकाकुव्वा पक्षी मी बाळगला होता. त्याला माझ्याबरोबर बोलण्यास खूप आवडत होते. इतक्यात बाजूच्या घरातून पाहुणे आले. काकाकुव्वा म्हणाला, 'या तुमचं स्वागत करतो. आमच्या बाई आणि यजमान अग्निहोत्र करण्यास आत बसले आहेत. आपण आत जाणार असाल तर जाऊन अग्निहोत्र म्हणजे काय हे पाहू शकता.'' याची बडबड चालली असतानाच अग्निहोत्र संपवून आम्ही बाहेर आलो. मग मी स्वतः त्यांना अग्निहोत्रासंबंधी माहिती देऊ लागले. आपण मूर्तीची पूजा करतो त्यापेक्षा अग्नीची उपासना जास्त श्रेष्ठ आहे. अग्नीची उपासना म्हणजे तेजाची उपासना आहे. भगवंताने सांगितले आहे त्याप्रमाणे जगातील सर्व धर्मात अग्नीच्या उपासनेला स्थान दिले आहे. रोजची साधी पूजा जरी केली तरी निरांजन, उदबत्ती इ. गोष्टी मानवाला सूक्ष्म रूपाने अग्नीचा प्रत्यय देतात. अग्नी हा मूळ धर्म मानला जातो. अग्निचे दिव्य स्वरूप वैदिक ऋषींना कळले होते. पार्थिवात (मॅटर) असलेली चैतन्यमयी उर्जा (एनर्जी) त्यांना ज्ञात होती. अशा चैतन्यमय उर्जेला म्हणजेच अग्निला व्यक्त स्वरूपात आणणे म्हणजेच देव समजून हवन करणे हा मूळ धर्म त्याकाळी ठरवला गेला. पुरुष सुक्तातील मंत्रावरून मानवासाठी सांगण्यात आलेला सर्वप्रथम धर्म यज्ञयागाचा होता.

मानवी जीवनवृक्षाला बहर येण्यासाठी ही उपासना सांगितली जाते. वायुमंडल शुद्धी हेतू प्रीत्यर्थ होम करा असा संदेश अक्कलकोट येथील गुरुपीठावरून परमसद्‌गुरु श्री गजानन महाराज यांनी विश्वातील सर्व मानवाला दिला आहे. अग्निहोत्र कर्मकांड नाही. जे सत्यसनातन (मूळधर्म) यात सांगितले आहे. त्याला पंचसाधन मार्ग म्हणतात. (यम, दान, तप, कर्म व स्वाध्याय) यज्ञ म्हणजे नित्य अग्निहोत्र होय. (पहिले साधन) या मार्गाचा अवलंब केला तर इतर चार मार्गांचे आचरण आपोआप घडते.

विशिष्ट धातुच्या, विशिष्ट आकाराच्या पात्रात (पिरॅमीड टाईप) ध्वनी लहरींच्या कंपनासमवेत विशिष्ट पदार्थांचे ज्वलन (गाईच्या गोवऱ्या व गाईचे तूप) केले तर या साऱ्यांचा परिणाम आपल्या मनावर सतत होत असतो. या कंपनाने मानसिक तणाव जाऊन मनात व घरात एक प्रकारचे आनंदमय वातावरण निर्माण होते. या अग्निहोत्राच्या धुराने प्राणवायू मिळतो व श्वसनाचा त्रास कमी होतो. मनात येणारे वाईट विचार आपोआप नष्ट होतात. कारण वातावरण शुद्ध होते. आपणास १९८४ मध्ये भोपाळ येथे विषारी वायुमुळे झालेली दुर्घटना ठाऊकच असेल. या विषारी वायुमुळे जी जीवित हानी झाली ती भरून येण्यासारखी नव्हती. त्यावेळी अग्नीच्या उपासनेचा वातावरणावर कसा परिणाम होतो हे प्रत्यक्ष तेथील अग्निहोत्री मंडळींनी अनुभवले. तेथे (भोपाळ) राहणारे शंकरलाल कुशवाह हे तेथील महानुभाव माधवजी संस्थान सत्यधर्म प्रचार-प्रसार करणारे प्रमुख आहेत. त्यांचा अनुभवच त्यांच्याच शब्दात सांगते;

''त्या दिवशी पहाटे दोनच्या सुमारास रस्त्यावर धावाधाव व कोलाहालाने मी जागा झालो. डोळ्यांची आग व्हायला लागली. माझी पत्नी व माताजी यांनाही डोळ्यांचा त्रास होऊ लागला. सर्वांना खोकला सुरू झाला. 'युनियन कार्बाईड' मधील विषारी वायू सर्वत्र पसरत होता. क्षणभर विचार आला; बैरागडला आश्रमात गेलो तर आपल्याला खरा आसरा मिळेल. परंतु माझ्या पत्नीने गाईच्या गोवऱ्या पेटवून अग्नी प्रज्वलीत केला आणि 'त्र्यंबकम् यजामहे' ह्या महामृत्युंजयाच्या मंत्राने हवन सुरू केले. गाईच्या तुपाचा जरा जास्त वापर केला. वीस मिनिटांनी साऱ्यांचा त्रास कमी झाला. घरातील वातावरण निवळले. त्या रात्री भोपाळचे लोक रस्त्यावरून धावत होते.'' यावरून आपल्याला कल्पना येते की वैदिक उपासना किती प्रभावी आहे. आपल्याला माहीत असेलच की ही उपासना वेदांत सायन्समधील आहे.''

आमच्या घरातील पाहुणे एकदम खूष झाले. आलेल्या पाहुण्याचा आदर सत्कार करून मी खूष झाले. एखाद्या व्यक्तीने जर अग्निहोत्र सुरू केले तर त्या व्यक्तीला दुःख झाले तरी ती सुखच मानते. कारण आपल्या मनावर या उपासनेमुळे कुठलाही वाईट परिणाम होत नाही.

''कुणी वंदा कुणी निंदा, सतत हसतमुख राहण्याचा आमचा धंदा''

हेच मी आपणास सांगू इच्छिते

(फोन : २६४९४०४१)

✳

# Appeal To Gen Next's Web Site & Pathare Prabhu Charities

**-Milind Kothare**

About five or six decades ago the community was mainly settled in south Mumbai & was well connected through various platforms & in general due to geographical proximity.

This gave all of them opportunities to interact & help each other in many aspects of life.

I want to draw attention towards what our predecessors did: they helped community job / career aspirants to get jobs in quality organizations like MacKinnon Mackenzie or State bank etc.

This helped the community bonding & helped aspiring career seekers & needy job seekers and in general the community had an informal support system.

Today the community has grown & moved and become geographically scattered.

I am also of the view that majority of our community falls in a good upper middle class income strata where there are no desperate job seekers but people are looking for quality advise & referrals.

When you look at other communities they still keep the bonding & work on referrals to get good openings for their community members keeping the competitive skills in mind.

We as a community have lost this bonding. I think all of us are trying for a stellar growth in the social network that all of us have developed for our children or children network themselves through their own network.

My suggestion is to create an additional channel to this networking & guiding to enhance community bonding.

So to keep up with changing times we can use technology & community bonding to grow in respective careers.

We Should Create Various Interest Groups On Our Youth Web Site Like

- ✶ Information Technology
- ✶ Pharmacy & Health Care
- ✶ Doctors & Clinical Practitioner's
- ✶ Lawyer & Solicitors
- ✶ Advertising & P R
- ✶ Banking & Finance
- ✶ B P O Group
- ✶ Hospitality
- ✶ Individual S M E Consulting

There could Be More Groups I request senior community members from each of these fields to play the role of mentors so that they lead the group & help group members to achieve the following objectives:

- ✶ To guide young aspirants on job referrals or career path
- ✶ Help mid – career level people with domain knowledge
- ✶ Share development opportunities in the industry, which will benefit the group

Most contributions should come from our overseas patrons who can guide our young generation with ground reality & opportunities available in developed countries & help with a road map for their careers.

Me on my part will offer to play the role for Hospitality & Individual S M E consulting field where I am open to the idea of answering queries on my Email address & update about developments in the industry if such a group is formed.

My appeal to Pathare Prabhu charity is when they award graduates & professionally qualified scholars they should motivate them to be mentors & be a part of each interest group so that their work is shared & young boys and girls who see them as heroes at the function get to interact effectively with them.

In fact they could have this interactive session as a part of the function during the ceremony.

✳

## साहित्याची मेजवानी

**- सुहासिनी सुहास कोठारे**

अलिकडेच ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले श्री. भालचंद्र नेमाडे यांचा गेटवे ऑफ इंडिया येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री. नेमाडेंचे साहित्य, तसेच पूर्वी ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज व विंदा करंदीकर ह्यांच्यादेखील साहित्याचा सन्मान झाला. ह्या मराठी साहित्याचा सुंदर सन्मान सोहळा दूरदर्शनवर रविवारी पाहून मन तृप्त झाले.

ह्या सर्वांच्या कादंबऱ्या, कविता संग्रह, नाटके, लेख ह्यांतील वेचक साहित्य घेऊन ते रसिकांपुढे कथाकथन, काव्यरूपाने व संगीताच्या माध्यमाने सादर केले होते. वि. स. खांडेकरांची अमृतवेल, ययाती त्यांतील उतारे, कुसुमाग्रजांचे 'वीज म्हणाली धरतीला' हे नाटक तसेच कुसमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत', 'प्रेम कुणावरही करावे', कणा, श्रावण ह्या कविता, विंदा करंदीकरांची सलाम, कविता. श्री नेमाडेंची कोसला, हिंदू ह्या कादंबरीतील उतारे इ. अभिवाचन व काव्यरूपाने ऐकून मन तृप्त झाले. जणू काही पंचपक्वानांची मेजवानीच. श्री. विनोद तावडे यांच्या निमंत्रणावरून सुहासिनी कीर्तिकर, मीनाक्षी जयकर जातीने उपस्थित होत्या. दूरदर्शनवर त्यांचेही दर्शन झाले! प्रत्यक्ष कार्यक्रमाची मजा लुटताना त्यांना पाहून क्षणभर हेवा वाटला. पण दूरदर्शनवरील मेजवानीने माझेही मन भरले.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-०६-१५ | सौ. कॅथरीन आणि श्री. अमित संजीव धुरंधर, | पुत्र, | फ्लोरिडा |
| १८-०६-१५ | सौ. अश्विनी आणि श्री. यश आनंद तळपदे | कन्या, | सांताक्रूझ |

### आत्याबाई नाव बोला

कु. ईशान अमित धुरंधर

### कुर्यात् बटोर्मंगलम्

१२-०४-१५ कु. आदिल जितेश तळपदे

### नारळ साखर दिला

११-०६-१५ कु. रीमा रजनीकांत नवलकर, श्री. सिद्धेश दीपक मानकर

### विवाह रौप्य महोत्सव

०८-०५-१५ श्री.भरत आनंद विजयकर, कु. ज्योती वसंत धुरंधर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३०-०५-१५ | श्री. सुहास आनंदराव प्रधान, | वय ७१, | सांताक्रूझ |
| ०९-०६-१५ | श्रीमती सुनेत्रा (बेबी) नितीन रणजीत, | वय ७०, | पवई |
| १०-०६-१५ | श्री. विनय बाळाराम त्रिलोकेकर, | वय ८६, | खार |
| १०-०६-१५ | श्री. कृष्णकांत कोठारे, | वय , | अंधेरी |

## प्रभुतरुणास देणगी

★ कै. रवींद्र सुंदरराव अजिंक्य यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती चंद्रसेना आणि पुत्र सिद्धेश व अंबरीष यांजकडून सप्रेम भेट रु. ५०१/-

★ श्री. नंदकुमार चंद्रकांत धैर्यवान यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

★ श्री. सिद्धेश रवींद्र अजिंक्य यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

★ श्री. मनोहर आनंदराव धुरंधर यांजकडून त्यांच्या पत्नी सौ. कविता यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रु. २५१/-

(सौ. कविता यांचे कर्नाटकात अचानकच निधन झाले. 'प्रभुतरुण' श्री. मनोहर यांच्या दु:खात सहभागी आहे.)

## अभिनंदन

★ डॉ. सुरेखा बन्सीधर धुरंधर यांना आदिवासी भागात काम करण्याबद्दल 'गोदावरी परुळेकर पुरस्कार' हे गौरवपूर्ण पारितोषिक प्राप्त झाले. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये याबद्दल सविस्तर माहिती आली. अभिनंदन.

★ साप्ताहिक लोकमत, २१ जून रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकात पाठारे प्रभू महिला समाजाच्या शताब्दीवर्षाची गौरवपूर्ण दखल घेतली गेली. मुंबईतील हा पहिला महिला समाज. त्याची वाटचाल, कार्य आणि कर्तृत्व यांचा आढावा सौ. वृंदा जयकर यांच्याशी संवाद साधून गौरी यांनी या लेखात घेतला आहे. सौ. साया नवलकर आणि सौ. वृंदा जयकर या दोघींच्या फोटोसहित आलेल्या या अहवालाबद्दल महिला समाजाचे अभिनंदन.

★ एन. एम. एम्. कॉन्व्हेंशन लॉस एंजलिस येथे ४ जुलै रोजी 'महाराष्ट्र मंडळ युएसए' तर्फे साजरे झाले. या उत्सवात प्रकाशयोजनाकार म्हणून श्री. शीतल तळपदे निमंत्रित होते. त्याचबरोबर या उत्सवात 'तिघांची गोष्ट', दीपाली विचारेचे नृत्य आदी कार्यक्रमांचे संचालन, आयोजनही श्री. शीतल तळपदे यांचेच होते. अभिनंदन.

*

## पत्र प्रतिक्रिया

संपादिका, सुहासिनीताई,
नमस्कार.

टीव्हीवरील 'कमला' मालिकेबद्दल थोडं तुमच्याशी बोलावसं वाटलं म्हणून ही पत्रप्रतिक्रिया.

देवाशिषची आई सुनेकडून मुलाची अपेक्षा करते. ती इतक्या थराला जाते की या बायकोकडून नाही होत मूल; तर दुसऱ्या बायकोकडून चालेल! बाई ही काय वस्तू आहे का?... आणि सुनेचा गरोदरपणाचा रिपोर्ट येण्याआधीच तिचे सोहाळे सुरू करून डोहाळे पुरविण्याचा किती तो सोस! बाईकडून ही बाईचीच अवहेलना पाहून वाटते की, आपण कोणत्या काळात वावरत आहोत. विजय तेंडुलकर लेखक असलेल्या नाटकाचे हे मालिका रूपांतर मनाला रूचत नाही

आपली,
सुहासिनी सुहास कोठारे

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दिनांक ७ जून रोजी पाठारे प्रभू चॅरिटीजची सर्वसाधारण वार्षिक सभा चॅरिटीजच्या सुरेश विठ्ठल हॉलमध्ये सायंकाळी पाच वाजता घेण्यात आली. संस्थेच्या घरोघरी पोहोचलेल्या वार्षिक अहवाल व आर्थिक ताळेबंदात या सभेची सूचना नेहमीप्रमाणे देण्यात आली होती. ही सभा सर्व विश्वस्तांच्या उपस्थितीत आणि चॅरिटीजचे विद्यमान अध्यक्ष श्री. उदय मानकर यांच्या अध्यक्षतेखाली रीतसर घेण्यात आली. चॅरिटीजने मांडलेल्या ठरावास सभेने एकमताने मान्यता दिली.

सभेचे कामकाज चालू असताना श्री. अशोक तळपदे, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. नरेश मानकर आणि श्री जयंत कीर्तिकर यांनी आपापली मते मांडली. काहींनी यावेळी घेतल्या गेलेल्या आक्षेपांना अनुलक्षून विश्वस्त श्री. अजित विजयकर यांनी चॅरिटीजच्या वतीने समर्पक उत्तरे दिली.

या सभेच्या सुरुवातीस अध्यक्ष श्री. उदय मानकरांनी आपला अध्यक्षीय तीन वर्षांचा कार्यकाळ संपत आल्याचे नमूद केले होते. सभा संपताना श्री. वीरपाल राणे यांनी त्यावर आपली प्रतिक्रिया नोंदविली. अजून यापुढचे दोन कार्यकाळ म्हणजे सहा वर्षे उदय मानकरच अध्यक्ष असतील असे सांगत चॅरिटीजसाठी मानकर देत असलेल्या योगदानाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. हा उल्लेख केल्यावर थोडेसे भावनावश होत त्यांनी सभेला आवाहन केले की 'मी सहा वर्षांनी असेन नसेन. मात्र श्री. उदय मानकरांचा उचित गौरवसत्कार त्यावेळी करा.' उदय मानकरांच्या काळात चॅरिटीजच्या गंगाजळीत झालेली लक्षणीय वाढ, त्यांची सतत काम करण्याची वृत्ती, त्यांचे निर्णय याबद्दल गौरवपर असे श्री. वीरपाल बोलले.

आभारप्रदर्शनानंतर सभेचे कामकाज आटोपले.

*

## परीक्षेतील सुयश

**शालांत परीक्षा, दहावी**
कु. अदिती सचिन विजयकर, ७८.२ टक्के

**उच्च माध्यमिक परीक्षा बारावी (कॉमर्स)**
कु. रूची सौमिल कोठारे,
गुण ४९५/६५० ७६.१५ टक्के
श्री. वरुण अजय कोठारे, ६७ टक्के

**उच्च माध्यमिक परीक्षा बारावी (सायन्स)**
श्री. अलंकार भूषण विजयकर
गुण ३९२/६५०

**एम्. एस. (कान्सास स्टेट)**
श्री. आकाश संतोष कोठारे

**एम्.बी.ए. (इन ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट)**
सौ. मिथिला लुकेश कोठारे

**एम्.बी.ए. डिप्लोमा इन फायनान्स**
श्री. निखील राजन नवलकर

### चुकीची दुरुस्ती

गतांकी मरण या सदरात श्री. आशुतोष जयवंत राणे असे कृपया वाचावे.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67